# एस. एन. डी. टी. शिक्षण शास्त्र महाविद्यालय

## बी.एड. प्रथम वर्ष

## विद्यार्थिनीचे नाव : रुपाली साठे

# शिक्षणाचा नवा अध्याय

# NATIONAL EDUCATION POLICY




तब्बल ३४ वर्षांनंतर नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला NATIONAL EDUCATION POLICY 2020 केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीला मंजुरी देण्यात आली . शालेय व उच्च शिक्षणाच्या रचनेत अमुलाग्र बदल करण्यात आले आहेत. शिक्षण प्रकारांना शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वीय करण्यात आले आहे. एकाच वेळी अभियांत्रिकी व संगीत हे दोन्ही विषय घेऊनही उच्च शिक्षण पूर्ण करता येईल. शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित केला जाणार असून २१ व्या शतकासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे:

- दहावी आणि बारावी या बोर्डाचे महत्त्व आता कमी होणार आहे.
- शालेय शिक्षणाची रचना १०+२ ऐवजी ५+३+३+४ अशी झाली आहे.
- सहावीनंतर व्यावसायिक शिक्षणही दिले जाईल.
- मातृभाषेत प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य असेल.
- केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने नावही बदलण्यात आले असून ते आता "शिक्षण मंत्रालय" झाले आहे.
- बहुभाषिक शिक्षण – मुलांना शिकवताना एकाच भाषेच्या माध्यमातून अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार.

३ ते १४ वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत, यापूर्वी हा वयोगट ६ ते १४ वर्षे होता.


शिक्षणातील गुंतवणूक जीडीपीच्या ६ टक्के करणार सध्या हे प्रमाण ४.४३ टक्के आहे.

## एकंदरीत पार्श्वभूमी

१९८६ रोजी पाहिलं शैक्षणिक धोरण देशात लागू झाल होत. त्यानंतर १९९२ मध्ये या शैक्षणिक धोरणात बदल करण्यात आले. २००९ मध्ये शिक्षण हक्क कायदा आणला गेला. ज्याची अंमलबजावणी २०१३ पासून करण्यात आली. इस्त्रोने माजी प्रमुख के. कस्तुरी रंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला आहे.

## शालेय शिक्षणात नवे सूत्र:

- शालेय शिक्षणाची रचना आता १०+२ ऐवजी ५+३+३+४ अशी झाली आहे.
- पहिली तीन वर्षे पूर्व प्राथमिक, त्यानंतर दोन वर्षे पहिली व दुसरी,
- पुढील तीन वर्ष - तिसरी ते पाचवी व
- पुढील तीन वर्ष - सहावी ते आठवी,
- अखेरची ४ वर्ष - नववी ते बारावी अशा १५ वर्षांमध्ये शालेय शिक्षण विभागण्यात आले आहे.



## Back To Basic

वयोगट ३ ते ८ मधील शिक्षण हे मूलभूत शिक्षण समजले जाईल आणि त्यासाठी बाल सुलभ शिक्षण आणि अभ्यासक्रम विकसीत केला जाईल. अंगणवाडीच्या शाळा पूर्व प्राथमिक वर्गांशी जोडल्या जातील तर शक्य असेल तेथे पूर्व प्राथमिक च्या शाळा प्राथमिक शाळेशी जोडण्यासाठी प्रयत्न केले जातील.

ज्या ठिकाणी सध्या अस्तित्वात असलेल्या अंगणवाडी आणि पूर्व प्राथमिक शाळा नवीन अभ्यासक्रम राबविण्यात अपयशी ठरतील. त्याठिकाणी सर्व सोयींनी युक्त नवीन स्वत्रंत पूर्व प्राथमिक शाळा उभारल्या जातील आणि शिक्षणा बरोबर ३ ते ६ वयोगटातील मुलांच्या बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकासा साठी आवश्यक सुविधा निर्माण केल्या जातील.

३ ते ८ वयोगटातील मुलांसाठी उपक्रमाधारीत, खेळाच्या माध्यमातून आणि लवचिकता असलेले शिक्षण दिले जाईल. पूर्व प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुलांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यावे यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

इयत्ता सहावी नंतर तीन भाषा शिक्षण पद्धती सुरू केली जाईल. ज्यात स्थानिक भाषेला प्राधान्य दिले जाईल. ज्यात स्थानिक भाषेला महत्त्व दिले जाईल. ज्या प्रदेशात हिंदी बोलली जात नाही त्या प्रदेशात हिंदी भाषा शिक्षणाला प्राधान्य दिले जाईल. तर हिंदी भाषिक प्रदेशात इतर कोणत्याही

मान्यता प्राप्त भारतीय भाषेला प्राधान्य दिले जाईल. व्यावसायिक शिक्षण शालेय शिक्षणात समाविष्ट केले जाईल.

## आंतरशाखीय शिक्षण

९ वी ते १२ वी एकत्र करून चार वर्षांचा कोर्स प्रस्तावित आहे. ज्यात कला, वाणिज्य, आणि शास्त्र असा शाखा निहाय फरक रद्द केला असून एकूण ८ सत्रांचा हा कोर्स असेल ज्यात भाषा, गणित आणि शास्त्र हे विषय बंधनकारक करून इतर कोणतेही विषय आपल्या आवडीनुसार निवडता येतील.

नव्या शैक्षणिक धोरणात १० वी १२ वी च्या बोर्डांच्या परीक्षा घेतल्या जाणार असल्या तरी त्याचे महत्त्व कमी होईल या परीक्षा वर्षातून दोन वेळा देखील होऊ शकतील. पाठांतर करून उत्तर लिहिण्या ऐवजी दैनंदिन उपयुक्त माहितीवर आधारित परीक्षा असेल. विज्ञान व कला अशा वेगळ्या शाखांतील विषय एकत्र घेऊन शिकता येतील. त्यामुळे आंतर शाखीय शिक्षण सुरू होईल.




## शिक्षकांचे शिक्षण

एन सी टी ई एन सी ई आरटीशी सल्लामसलत करून शिक्षक शिक्षणासाठी एक नवीन आणि सर्वसमावेशक राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, एनसीएफटीई २०२१ तयार करेल. २०३० पर्यंत, शिक्षणासाठी किमान पदवी पात्रता ही ४ वर्षाचा एकात्मिक बी.एड. पदवी असेल गुणवत्तेशी तडजोड करणाऱ्या नियमनबाह्य शैक्षणिक संस्था विरोधात कडक कारवाई करण्यात येईल.

शाळांमध्ये असलेल्या हुशार मुलांना अपेक्षित शिक्षण मिळावे म्हणून "राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रमा" अंतर्गत दर आठवड्याला पाच तासाचे अतिरिक्त शिक्षण पुरविले जाईल. तसेच अपेक्षित पेक्षा मागे असलेल्या मुलांसाठी नियमित शाळेच्या वेळेत आणि वेळानंतर ही उपाययोजनात्मक शिक्षण पुरविले जाईल.

प्रत्येक विद्यार्थ्याकडे नीट लक्ष देता यावे यासाठी विद्यार्थी शिक्षक प्रमाण ३०:०१ असे ठेवणे वाचनाला आणि त्यातून ज्ञानवृद्‍धीला प्राधान्य मिळावे. म्हणून संपूर्ण देशात सार्वजनिक ठिकाणी आणि शाळांमध्ये ग्रंथालये आणि वाचन कक्ष उभारणे.

मुलांच्या हजेरीवर आणि मानसिक स्थितीवर लक्ष ठेवून त्यात सातत्य राखण्यासाठी प्रत्येक शाळेत एक समाजसेवक आणि एका मानसशास्त्रज्ञाची नियुक्ती करणे.

अपेक्षित ध्येय गाठण्यासाठी शाळांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा पुरविणे.

## प्रगतीपुस्तकातही बदल

प्रगतीपुस्तकात फक्त गुण व शिक्षकांचे शेरे न देता स्वतः विद्यार्थी,सहविद्यार्थी व शिक्षक यांनी मूल्यमापन करायचे आहे. त्या आधारावर विद्यार्थ्यांच्या जीवन कौशल्यांचा विकास करता येईल हे ठरवता येईल.

## विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

एससी,एसटी, ओबीसी आणि एसईडीजी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न केले जातील. राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा विस्तार करून शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेतला जाईल. खाजगी

संस्थांना देखील मोठ्या प्रमाणावर शिष्यवृत्ती देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

## मार्गदर्शक मोहीम

एका राष्ट्रीय मार्गदर्शक मोहिमेची (नॅशनल मिशन फॉर मेन्टॉरिंग) स्थापना करण्यात येईल यात उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या ज्येष्ठ/निवृत्त अध्यापकाचा समावेश असेल.भारतीय भाषांमध्ये शिकवणारे शिक्षकही यात असतील. जे थोड्या आणि दीर्घ काळासाठी मार्गदर्शक म्हणून विद्यापीठ / महाविद्यालयीन शिक्षकांना मदत करतील.


एक एक
अक्षर शिकूया;
ज्ञानाचा
डोंगर चढूया .
Marathi
Slogans
.com